*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-02, Issue-I, August 2011*

# जळगांव जिल्ह्यातील शहरी भागातील इयत्ता नववीतील मुलांच्या आणि मुलींच्या नेतृत्व गुणांचा अभ्यास

**प्रा. अजयकुमार रामदास इंगळे :** सद्गुरु एज्युकेशन सोसायटी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय जळगांव

**प्रस्तावना :**

भारताने लोकशाही शासनपध्दतीचा स्वीकार केलेला आहे. लोकशाही प्रधान राज्य पध्दतीमध्ये विशिष्ट मनोवृत्तीची जोपासना होणे आवश्यक असते. भारतीय लोकशाही ही लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या मदतीने क्रियाशील होत असते. लोकप्रतिनिधींची निवड भारतात असलेल्या विविध राजकीय पक्षांच्या मार्फत होत असते. लोकशाही ही एक स्वतंत्र मनोवृत्ती मानली जाते. लोकशाही मनोवृत्ती नेतृत्वाचे स्वयपातही हुकुमशाही मनोवृत्तीपेक्षाही भिन्न असते. त्यामुळे लोकशाही मनोवृत्ती असणारे नेतृत्व जोपासणे हे लोकशाहीप्रधान देशातील शिक्षण व्यवस्थेचे एक महत्त्वाचे ध्येय असणे आवश्यक असते. शिक्षणाने असे नेतृत्व विद्यार्थ्यांमध्ये जोपासले जाणे हे लोकशाही यशस्वीतेसाठी अत्यावश्यक असल्याने अशा लोकशाही मनोवृत्तीच्या विकासाचा शोध घेणे व त्यात कोठे कमतरता असल्यास ती दूर करणे यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीचे एखादे महत्त्वाचे साधन वापरणे आवश्यक असते. अशा मानसशास्त्रीय कसोट्या प्रमाणित झाल्या असूनही त्यांचा उपयोग पाहिजे त्या प्रमाणात शाळेत होताना दिसत नाही. असे मापन होऊन नेतृत्वाच्या गुणांच्या विकासाचा पुरावा मिळवणे अत्यावश्यक वाटते. शास्त्रीय पध्दतीने नेतृत्व गुणांचे मापन झाल्यानंतर शिक्षण पध्दतीतील शोध घेणे आवश्यक आहे. नेतृत्वाचा विकास होताना मुले आणि मुली यांच्या विकासक्रमात काही फरक असल्यास त्यानुसार शिक्षणाचे कार्यक्रम ठरवितांना अशा स्वरूपाच्या संशोधनाचा शिक्षक, पालक, विद्यार्थी व शासक यांना विशेष उपयोग होऊ शकेल असे वाटल्याने प्रस्तुत संशोधन हाती घेतले आहे.

नेता हा कार्यतत्पर, अनुयायांबद्दलची कळकळ सर्वांची मते विचारात घेऊन मार्गक्रमण करणारा, आचरणाने शुध्द, संघटन, योग्य निर्णयक्षमता इत्यादी गुणविशेष नेत्या जवळ असतात. नेतृत्वास आवश्यक असणाऱ्या सर्व गुणविशेषांचा अंगीकार मुले आणि मुली यांच्यात सारखाच होतो का? मुले आणि मुली यांच्या नेतृत्वगुणात काही फरक आढळतो का? हे अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधन समस्या हाती घेतली आहे.

## संशोधन समस्येचे शीर्षक:

**“जळगांव जिल्ह्यातील शहरी भागातील इयत्ता नववीतील मुलांच्या आणि मुलींच्या नेतृत्व गुणांचा अभ्यास”**

www.ghrws.in

**ISSN 0976-9714**

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-02, Issue-I, August 2011*

**महत्त्वाच्या संज्ञांच्या सैध्दांतिक व्याख्या व कार्यात्मक व्याख्या :**

**सैध्दांतिक व्याख्या :**

पीटर डकर – "नेतृत्व म्हणजे व्यक्तीची दृष्टी व अभिव्यक्ती उंचावण्याचे आणि व्यक्तीमत्व विकसीत करण्याची प्रक्रिया होय."

फिडलर – "इतरांच्या कार्याला प्रभावित करणाऱ्या व्यक्तीला नेता म्हणतात."

**कार्यात्मक व्याख्या :**

नेतृत्व गुण : नेतृत्व गुण म्हणजे आकर्षक व्यक्तीमत्व, पुढाकार वृत्ती, बौध्दिक पात्रता, विनोद क्षमता, आत्मविश्वास, उत्साह, नैतिकता, निर्णय क्षमता यांचा संघात होय.

**संशोधनाची गरज व महत्व :**

लोकशाही राज्य पध्दती स्विकारलेल्या देशाला शिक्षणाचे अत्यंत महत्व आहे. देशातील नागरीक किती सुजाण आहेत, किती कार्यक्षम व कर्तव्यनिष्ठ आहे यावरच या देशाचे भवितव्य ठरणार आहे. भारतासारख्या लोकशाही प्रधान देशात शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. लोकशाही यशस्वीतेसाठी चांगल्या सुजाण नागरिकांची गरज आहे असे नागरिकत्व विद्यार्थ्यामध्ये बनविणे, चांगले, सुस्पष्ट, चिकित्सक, तर्कशुध्द विचारशक्ती, नविन कल्पनांचा स्विकार करण्याची पात्रता, योग्य निर्णयक्षमता इत्यादी बाबी अंतर्भूत होतात. शिक्षणाने शिस्त, सहकार्य, सहिष्णुता, सामाजिक निर्णयक्षमता इत्यादी विविध गुण बिंबवले पाहिजे व हे गुण लोकशाही जीवनपध्दतिला पोषक आहेत. माध्यमिक शिक्षण हे प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण यांना जोडणारा दुवा आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी चांगले नेतृत्व गुण जोपासण्यासाठी माध्यमिक शिक्षणाचा कालखंड अत्यंत महत्वाचा आहे. लोकशाही कल्पना, आदर्श मुल्य, कार्यक्षमता, स्वच्छ व निटनेटकेपणा इत्यादी विद्यार्थ्यांमध्ये बिंबवण्याचे कार्य शिक्षणाच्या माध्यमातून केले जाते की जेणेकरून निकोप लोकशाही समाज निर्माण होऊन नेतृत्वाची जबाबदारी पेलणारे नागरीक तयार करण्याचे कार्य शिक्षणाचे आहे.

आजचे विद्यार्थी हे उद्याच्या विविध क्षेत्रातील नेते आहे. जसे उद्योग क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, राजकीय क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, सांस्कृतिक, आर्थिक क्षेत्र अशा विविध क्षेत्रातील नेतृत्व आजचे विद्यार्थी करणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्यात सुप्त गुणे असतात. हे सुप्त गुण तो शालेयस्तरावर राबवणाऱ्या बौद्धिक, कलात्मक, सांस्कृतिक, सामाजिक, खेळ यासारख्या कार्यक्रमाद्वारे अभिव्यक्त होत असतात. विद्यार्थ्याच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना चालना देऊन नेतृत्व गुण जोपासले पाहिजे.

नेतृत्व गुणाच्या मापनाचा अभ्यास आतापर्यंत अभ्यासुंनी वेगवेगळ्या अंगांनी केलेला दिसून येतो. जळगांव जिल्हयातील शहरी भागातील इयत्ता नववीतील मुला-मुलींचे नेतृत्व गुणाचे मापन शास्त्रशुध्द पध्दतीने करून

**ISSN 0976-9714**

www.ghrws.in

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-02, Issue-I, August 2011*

त्यांच्या नेतृत्व गुणात काही फरक असल्यास त्यातील अडचणी दूर करणे क्रमप्राप्त ठरते. अशा स्वरूपाच्या संशोधनाचा विशेष उपयोग शिक्षक, पालक, विद्यार्थी व शासन यांना होईल म्हणून प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे:**

१) जळगांव जिल्ह्यातील शहरी भागातील इयत्ता नववीतील मुलांच्या आणि मुलींच्या नेतृत्व गुणांचा अभ्यास करणे.

२) जळगांव जिल्ह्यातील शहरी भागातील इयत्ता नववीतील मुलांच्या आणि मुलींच्या नेतृत्व गुणांची तुलना करणे.

**संशोधक विषयक गृहितके:**

माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांमध्ये अनेक सुप्त गुण असतात. त्याचप्रमाणे नेतृत्व गुण हा सुद्धा एक गुण आहे.

**संशोधन समस्येची परिकल्पना:**

जळगांव जिल्ह्यातील शहरी भागातील इयत्ता नववीतील मुला-मुलींच्या नेतृत्व गुणात सार्थ फरक नाही.

**संशोधन समस्येची व्याप्ती व मर्यादा:**

जळगांव जिल्ह्यातील शहरी भागातील इयत्ता नववीतील मुला-मुलींच्या नेतृत्व गुणांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केलेला आहे.

**नेतृत्व गुण:**

प्रोफेसर सी.एस.राठौर, प्रोफेसर अॅन्ड एच.ओ.डी. फिजिकल एज्युकेशन, रानी दुर्गावती विश्वविद्यालय जबलपूर यांनी प्रमाणि केलेली नेतृत्व गुण मापिका (लिडरशिप अॅबिलीटी स्केल) च्या आधारे नेतृत्व गुणांचे मापन केले.

प्रस्तुत संशोधनात जळगांव जिल्ह्यातील शहरी भागातील इयत्ता नववीच्या मराठी माध्यमातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा समावेश केलेला आहे. या संशोधनात त्यांचा फक्त नेतृत्व गुणांचाच अभ्यास करण्यात आलेला नाही ही प्रस्तुत शोधनिबंधाची मर्यादा आहे.

**संशोधन पध्दती व साधने:**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अंगीकर केलेला आहे.

**साधने :** प्रोफेसर सी.एस.राठौर, फ्रोफेसर अॅण्ड एच.ओ.डी. फिजिकल एज्युकेशन, राणी दुर्गावती विश्वविद्यालय जबलपूर यांनी प्रमाणित केलेली नेतृत्व गुण मापिकेचा (लिडरशिप अॅबिलीटी स्केल) वापर केला.

www.ghrws.in

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-02, Issue-I, August 2011*

**न्यादर्श :** प्रस्तुत संशोधनात जळगांव जिल्ह्यातील शहरी भागातील पाच टक्के शाळांची निवड करण्यात आली. या शाळेतील इयत्ता नववीचे विद्यार्थी यादृच्छिक नमूना निवड पध्दतीने निवड करण्यात आले.

मुले आणि मुली संख्यात्मक – ३६० मुले व २८०मुली अशी एकूण ६४० मुले (पाच टक्के) निवडण्यात आले.

**माहितीचे संकलन व विश्लेषण:** नेतृत्व गुणमापिका विद्यार्थ्यांना पध्दतशीर देऊन मुले आणि मुली यांची प्रतिसादात्मक उत्तरे तपासली. दिलेला प्रतिसाद स्वतंत्रपणे तक्त्यात नोंदवून माहितीचे संकलन व विश्लेषण केले.

**जळगांव जिल्ह्यातील शहरी भागातील इयत्ता नववीतील मुलां-मुलींचे नेतृत्व गुण दर्शवणारा तक्ता :**

| **तपशिल** | **मध्यमान** | **प्रमाण विचलन** | **नमुना** "टी" | **प्राप्त "टी"** | **सार्थकता स्तर** |
|---|---|---|---|---|---|
| **मुले** | १६.०५ | ३.४७ | १.९६ | २.६८ | ०.०५ |
| **मुली** | १७.९३ | ३.३८ | | | |

**स्वाधिनता मात्रा: ६३८**

**माहितीचा अन्वयार्त आणि निष्कर्ष:** जळगांव जिल्ह्यातील शहरी भागातील इयत्ता नववीतील मुले आणि मुली यांच्या नेतृत्व गुणांच्या माध्यमानात तुलना केली असता असे आढळते की, शहरी भागातील मुलांचे मध्यमान १६.०५ असे असून प्रमाण विचलन ३.४७ आहे तर मुलींचे मध्यमान १७.९३ असे आढळले की, शहरी भागातील मुलांचे मध्यमान १६.०५ असे असून प्रमाण विचलन ३.४७ आहे तर मुलींचे मध्यमान १७.९३ असे असून प्रमाण विचलन ३.३८ आहे.

शहरी भागातील मुले आणि मुली यांचा नेतृत्व गुणांच्या बाबतीत ०.०५ या विश्वासस्तरावर "टी"चे प्राप्त मूल्य २.६८ मिळाले. "टी" चे प्राप्त मूल्य हे नमुना "टी" मूल्य १.९६ पेक्षा अधिक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग केला.

**निष्कर्ष:** जळगांव जिल्ह्यातील शहरी भागातील इयत्ता नववीच्या मुला-मुलींच्या नेतृत्व गुणात सार्थ फरक दिसून आला. शहरी भागातील मुलींचे नेतृत्व गुण हे मुलांपेक्षा अधिक असल्याचे दिसून आले. मुले आणि मुली यांचे नेतृत्व गुण हे मध्यम प्रतीचे असल्याचे दिसून आले.

**शिफारसी:**शिक्षकांनी मुले आणि मुली असा भेद नेतृत्व बाबतीत करू नये. नेतृत्वाच्या बाबतीत शालेय व्यवस्थापनात लोकशाहीचा अंगीकार करावा. लोकशाही यशस्वी रीतीने चालण्यासाठी मुले आणि मुली या दोघांचे मंत्रीमंडळ आणावे.शालेय स्तरावर कार्यक्रमांची आखणी करतांना मुले आणि मुली यांना दोघांना समान संधी द्यावी. नेतृत्व शिबिराचे आयोजन करतांना दोघांना सहभागी करावे. एन.सी.सी., एन.एस.एस. सारख्या कार्यक्रमात मुले आणि मुली यांना समान प्राधान्य द्यावे. स्वयंशासन दिनाचे आयोजन करतांना मुले आणि मुली यांच्यात पुढाकार

**ISSN 0976-9714**

www.ghrws.in

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-02, Issue-I, August 2011*

वृत्ती निर्माण करावी. दैनंदिन कामकाज ग्रंथांचे वाटप शालेय स्तरावर कार्यक्रमाची जबाबदारी मुले व मुली यांचेवर टाकावी.

**संदर्भ साहित्य सुची :**

१. बुच एम.बी., शैत्रणिक संशोधन सर्वेक्षण भाग १ ते ४ एन.सी.ई.टी. प्रकाशीत अहवाल.
२. मुळे रा.श. व उमाठे वि.सु., १९८७ शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे महाराष्ट्र ग्रंथ निधी मंडळ नागपूर.
३. शारंगपाणी मु.मु., सामाजिक मानसशास्त्री विद्या प्रकाशन ३२२, सदाशिव पेठ, पुणे
४. झांबरे एम.ए. व पाटील डी. एस. १९९१ उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक व शिक्षण, अभिनव प्रकाश मंडळ, विद्यानगर, फैजपूर.
५. भिंताडे वि.ए., शैक्षणिक संशोधन पध्दती, नुतन प्रकाशन, पुणे
६. पंडीत बन्सीबिहारी, १९९७ शिक्षणातील संशोधन, नुतन प्रकाशन, पुणे
७. बापट, भा.गो. १९९५ शिक्षणातील संशोधन, नुतन प्रकाशन, पुणे
८. देशापांडे प्रकाश, पाटील एन.के. १९९७ संशोधन पद्धती, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक
९. ताम्हणकर श्री. दा. १९७६, शैक्षणिक प्रशासन व नियोजन, नुतन प्रकाशन, पुणे

* *

www.ghrws.in